

# MAHILA MAHAVIDYALAYA

## AMRAVATI

opp. SBI Main Branch, Jog Chowk, Amravati.
Telephone : 0721- 2571115
e-mail : mahilamahavidyalaya.amt@gmail.com website : www.mmv.ac.in

AQAR 2022-23

# Criterion VI

## GOVERNANCE, LEADERSHIP AND MANAGEMENT

**6.1.2 : The effective leadership is visible in various institutional practices such as decentralization and participative management.**

## - College Council Meeting Minutes -

*Submitted to*

**THE NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**

PAGE NO.
DATE 12/05/23

शैक्षणिक सत्र 2022-23

कॉलेज कौन्सिलची सभा (दि. 12/05/2023)

मान्यवर प्राध्यापकांची उपस्थिती

| अ.क्र. | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| 01 | प्रा. डॉ. शालिनी के. पांडे | |
| 2. | भावना वासनिक | |
| 3. | प्रा. डॉ. पल्लवी अंभोरे | |
| 4) | प्रा. डॉ. मंजुषा धापुडकर | |
| 5) | प्रा. डॉ. जयश्री वैष्णव | |
| 6) | Dr. Sushama Deshmukh | |
| 7) | J. N. Parate | |
| 8) | P. J. Aulhane | |
| 9) | V. G. Wandikar | |
| 10) | सचिन देशमुख | |
| 11) | प्रा० डॉ० स्नेहाशिष दास | |
| 12) | प्रा० डॉ० अंकुश शिंदे | |

PAGE NO.
DATE / /

# कॉलेज कौन्सिल सभा दि. 12 मे 2023

## इतिवृत्त (Minutes)

शैक्षणिक सत्र 2022-23 कॉलेज कौन्सिलची सभा दिनांक 12/05/2023 रोजी दुपारी 3:00 वा. मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयातील बोर्ड रूम मध्ये संपन्न झाली. सभेपुढील विषय खालील प्रमाणे होते.

1) सत्र 2021-22 मधील शेवटच्या कॉलेज कौन्सिल सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे
2) शैक्षणिक सत्र 2022-23 मधील एकंदर कामकाजा संबंधी चर्चा करणे.
3) शैक्षणिक सत्र 2023-24 मधील शैक्षणिक व शिक्षणपूरक उपक्रमांचा आढावा घेणे
4) शैक्षणिक सत्र 2023-24 च्या खालेवारपास मंजूरी प्रदान करणे.
5) मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय
6) शैक्षणिक सत्र 2023-24 करिता नविन कॉलेज कौन्सिल सचिवांची नियुक्ती करणे.

दि. 12 मे 2023 रोजी संपन्न झालेल्या कॉलेज कौन्सिलच्या सदर सभेमध्ये सर्वप्रथम कॉलेज कौन्सिल सचिव श्री विजय वडीकर यांनी सुरवातीला सभेचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील व सर्व सन्माननीय प्राध्यापक सभासदांचे स्वागत केले. त्यानंतर विषय क्र. 1 नुसार कॉलेज कौन्सिल चे सचिव श्री. विजय वडीकर यांनी शैक्षणिक सत्र 2021-22 च्या दि. 30/06/22 रोजी संपन्न झालेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन मा. अध्यक्षांच्या सूचनेनुसार वाचून करून सभेपुढे सदर इतिवृत्त मंजूरी करीता ठेवून सर्वानुमते ते मंजूर करण्यात आले.

सदर विषयानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने विषय क्र. 2. शैक्षणिक सत्र 2022-23 मधील एकंदर कामकाजा संबंधी चर्चा करणे हा सभेपुढे मांडण्यात आला. त्याअंतर्गत

सर्वप्रथम मा. प्राचार्य डॉ. अविनाश मोहील यांनी सदर वर्षी हे नॅक मूल्यांकनामुळे महाविद्यालयाकरीता अतिशय महत्वाचे होते असे मत व्यक्त करून सदर नॅक प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाची पालक संस्था नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या सन्माननीय अध्यक्ष, सन्माननीय सचिव व सन्माननीय पदाधिकारी आणि सदस्यांनी महाविद्यालयाच्या भौतिक सुविधा व इतर सोयी उपलब्ध करून देण्यासाठी जो मोलाचा पाठिंबा दिला त्याकरीता नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष, सन्माननीय सचिव, पदाधिकारी व सदस्यांचे आभार व्यक्त केले तसेच सदर प्रक्रियेत प्राध्यापकांनी केलेल्या अपार परिश्रमाचे कौतुक करून महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या B++ श्रेणी बद्दल प्राध्यापकांचे अभिनंदन केले. तसेच नॅक प्रक्रिये मध्ये ज्या विद्यार्थीनींनी मोलाचा हातभार लावला अश्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थीनींचे तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी व विद्यार्थीनींच्या पालकांचे कौतुक करून त्यांचे सुध्दा अभिनंदन केले.

याच विषयाअंतर्गत मा. प्राचार्यांनी असे नमुद केले की, सत्र 2022-23 अंतर्गत टिचींग-लर्निंग (Teaching-Learning) प्रक्रिये मध्ये CBCS पध्दती लागु झाली असून सदर पध्दती राबवित असतांना प्राध्यापकांचे orientation झाले नसल्यामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे आपल्या महाविद्यालयाने आघाडी घेऊन H.V.P.M. मध्ये workshop घेतल्याचा सुध्दा उल्लेख केला. तसेच प्राध्यापकांनी सुध्दा याबाबत सखोल विचार करून व स्वत: मध्ये C.B.C.S बद्दल जागरूकता निर्माण करून सर्व अडचणीवर मात करावी असे आवाहन सुध्दा सर्व प्राध्यापकांना केले.

तदपश्चात मा. प्राचार्यांनी Generic open Elective (GOE) अंतर्गत डॉ. मा. अंजली गिरी व डॉ. मा. प्रतिभा हुमणे यांनी personality Development वर Online mode द्वारे विद्यार्थीनींना केलेल्या मार्गदर्शना बद्दल दोघांचे ही

DATE / /

अभिनंदन केले. तसेच मा. प्राचार्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन प्रा. डॉ. मंजुषा धाकुडकर आणि प्रा. डॉ. पल्लवी अंभोरे यांनी Gender Sensatization कोर्स तयार केल्याबद्दल त्यांचे सुद्धा अभिनंदन केले. व पुनःश्च एकदा सर्व प्राध्यापकांना आवाहन केले की, सर्वांनी पुढाकार घेऊन अशाचप्रकारे आपआपली जबाबदारी पार पाडावी.

यानंतर विषय क्र. 3 शैक्षणिक सत्र 2023-24 मधील शैक्षणिक व शिक्षणपूरक उपक्रमांचा आढावा घेणे. या अंतर्गत मा. प्राचार्यांनी सदर शैक्षणिक सत्रातील C.H.B शिक्षकांची नियुक्ती जून महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात निश्चितपणे होईल असे नमूद करून त्या करीता आवश्यक प्रक्रिया सुद्धा पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मा. प्राचार्यांनी येणाऱ्या वर्षात नविन शैक्षणिक धोरण (N.E.P.) सुद्धा राबविण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती सर्वांना दिली. त्या अंतर्गत नवनविन बदल सुद्धा घडून येतील असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे सर्वांना गांभीरपणे वेळ घेऊन बदल आत्मसात करावे लागतील अशा सूचना दिल्या. तसेच Internship करीता नामांकित संस्था शोधून त्यांच्यासोबत MOU करून त्याचा व्यवस्थित रेकॉर्ड ठेवावा लागेल व Mentor-Mentee Scheme अंतर्गत विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करून प्रत्येक ग्रुपला एक Mentor देऊन सदर उपक्रम सामर्थ्याने राबविण्याची माहिती व्यक्त केली. तसेच C.B.C.S. अभ्यासक्रमाचे तिसरे व चौथे सेमिस्टर झाल्यावर विद्यार्थ्यांना NPTL, MOOC व Swayam या Online E-learning portal द्वारे विषयांची निवड करून सदर courses ची प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना credits द्यावे लागतील असे मा. प्राचार्यांनी नमूद केले. तसेच या अंतर्गत E-content विकसित करण्याकरीता लागणारे नविन तंत्रज्ञानाचा वापर करावा त्याकरीता लागणारे उपकरणे विकत घेण्याचा मानससुद्धा मा. प्राचार्यांनी

व्यक्त केला व सदर बदलांकरीता सर्व प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या.

तदनंतर विषय क्र. ४. शैक्षणिक सत्र 2023-24 च्या खालेवाटपास मंजूरी प्रदान करणे हा सभेपुढे मांडला. सदर विषयावर चर्चा करतांना मा. प्राचार्यांनी सर्वप्रथम सदर खातेवाटपामध्ये कोणताही बदल होणार नाही याबाबतची नोंद प्राध्यापकांनी घ्यावी असे नमूद केले. तसेच खातेवाटपाअंतर्गत नियुक्त केलेल्या समित्यांनी नॅक च्या क्रायटेरीयानुसार सर्व उपक्रम राबवावे असे सांगितले जेणे करून दरवर्षीचा AQAR भरण्यास अडचणी येणार नाहीत. व त्या आधारावर सरतेशेवटी S.S.R. तयार करण्यास मदत होईल. विषय क्र. ४ च्या चर्चेअंती मा. प्राचार्यांनी खातेवाटपाचे वाचन करून सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

यानंतर विषय क्र. ५. मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयाअंतर्गत मा. प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना Diaries, Catalogue व Confidential Report कार्यालयास जमा करण्यास नविन सत्र सुरु होण्यापर्यंतची मुभा दिली. तसेच चर्चेअंतर्गत प्रा. डॉ. अंकुश गिरी यांनी महाविद्यालयाकरीता LMS software ची आवश्यकता असल्याचे सांगितले त्यावर मा. प्राचार्यांनी प्रा. डॉ. अंकुश गिरी यांना Quotation मागवावे असे सूचित केले जेणे करून सदर Quotation C.D.C च्या बैठकीत ठेऊन खरेदी करण्यास सुलभता प्राप्त करून देऊ.

सरतेशेवटी विषय क्र. ६ शैक्षणिक सत्र 2023-24 करीता कॉलेज कौन्सिल सचिवाची नियुक्ती करणे हा सभेपुढे ठेवण्यात आला. त्यानुसार प्रा. डॉ. प्रविण गुल्हाने यांची सचिवपदावर नियुक्ती मा. प्राचार्यांद्वारे करण्यात येऊन मा. प्राचार्यांच्या हस्ते नवनियुक्त

PAGE NO.
DATE / /

सचिवांना पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पुढील कार्यकाळाकरीता शुभेच्छा देण्यात आल्या.
सदर सभेच्या अंती कॉलेज कौन्सिल सचिवांनी मा. अध्यक्षांचे आणि सर्व सभासदांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाल्याची घोषणा केली.

विजय ग. वडीकर
कॉलेज कौन्सिल सचिव.

प्राचार्य
महिला महाविद्यालय
अमरावती.